## प्रकरण पाचवे

## ऊसतोड कामगार समस्या व सूचना

५.१ प्रास्ताविक

५.२ ऊसतोड कामगारांचे प्रकार, प्रमाण व स्वरूप

५.३ स्थलांतराचे स्वरूप

५.४ ऊसतोड कामगारांची कौटुंबिक वैशिष्ट्ये

५.५ रोजगार वेतन व कामगार संघ स्थिती

५.६ उत्पन्न व खर्चविषयक स्थिती

५.७ राहण्याची व्यवस्था, शिक्षण व आरोग्यविषयक स्थिती

५.८ ऊसतोड कामगार समस्या व सूचना

## प्रकरण पाचवे

## ऊसतोड कामगार समस्या व सूचना

### ५.१ प्रास्ताविक :

कामगारांच्या स्थलांतराच्या अर्थशास्त्रीय सैध्दांतिक चौकटीच्या आधारे " वसंत (दादा) शेतकरी सहकारी साखर कारखाना, सांगली " या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊस तोडणीचे काम करणाऱ्या कामगारांचे नमुना पाहणी पध्दतीने सामाजिक आर्थिक सर्वेक्षण केलेले आहे. ग्रामीण भागातून ग्रामीण भागाकडे होणाऱ्या स्थलांतराचे स्वरूप, प्रमाण व रचना अभ्यासणे, ऊस तोड कामगारांच्या सध्याच्या आर्थिक सामाजिक स्थितीचे वर्णन करणे, त्यांच्या समस्या तपासणे हे सर्वेक्षणाचे प्रमुख उद्देश होते. तसेच ग्रामीण भागातून ग्रामीण भागाकडे कामगारांचे स्थलांतर होण्याची कारणे कोणती व स्थानिक कामगार ऊस तोडणीच्या कामाकडे का आकर्षित झाले, हेही सर्वेक्षणाचे सहाय्याने वर्णिले आहे.

### ५.२ ऊस तोड कामगारांचे प्रकार, प्रमाण व स्वरूप -

ऊस तोडणीचे काम करणारे कामगार स्थानिक व स्थलांतरीत असून त्यांचे प्रमाण अनुक्रमे ११.११ टक्के व ८८.८९ टक्के इतके आहे व स्थानिक व स्थलांतरीत एकूण कामगारांपैकी १६.६६ टक्के हे बैलगाडीवान आहेत. ऊस तोडणी कामगारामध्ये स्थानिक कामगारांच्यापेक्षा स्थलांतरीत कामगारच अधिक प्रमाणात आहेत.

ऊस तोडणीच्या कामावर असणाऱ्या कामगारांच्या स्वरूपाचे वर्णन करता असे आढळून येते की, १७.७८ टक्के कामगार एकटे एकटे आहेत. ४७.७८ टक्के कामगार हे पत्नी व लहान मोठी मुले यांच्यासह तर ३४,४४ टक्के कामगार पत्नी व इतर नातेवाईकांसह कामावर आलेले आहेत.

थोडक्यात बायका, मुले व इतर नातेवाईक कुटुंबीय यांच्यासह स्थलांतरीत झालेल्या कामगारांची संख्या ऊस तोड कामगारामध्ये अधिक प्रमाणात आहे.

५.३ स्थलांतराचे स्वरूप :

ऊस तोड कामगारांच्या स्थलांतराची कारणे ही उत्प्रेरण व आकर्षण या घटकांच्या आधारावरच अभ्यासलेली आहेत. पूर्ण व अर्धबेकारी, कमी वेतन पातळी, कर्जबाजारीपणा व दारिद्र्य यासारख्या आर्थिक दुरावस्थेमुळे कामगार मूळगावाहून बाहेर ढकलला जात असेल तर त्यास उत्प्रेरणात्मक घटकामुळे झालेले स्थलांतर असे म्हणतात, तर अधिक चांगल्या रोजगार संधी व आर्थिक परिस्थिती सुधारणेच्या इच्छेने होणा-या स्थलांतरास आकर्षणात्मक घटकामुळे झालेले स्थलांतर असे म्हणतात. आकर्षण घटकापेक्षा उत्प्रेरण घटक अधिक प्रभावी ठरतात. ऊस तोड कामगारांच्या सर्वेक्षणातही हेच प्रत्ययास येते. कारण उत्प्रेरणात्मक कारणामुळे झालेले स्थलांतर ७०.४६ टक्के इतके आहे, तर आकर्षणात्मक कारणामुळे झालेले स्थलांतर २९.५४ टक्के इतके आहे.

थोडक्यात मूळगावी रोजगारीचा अभाव व कमी वेतन पातळी याबरोबरच त्यांच्या मूळ गांवी सतत पडणारा दुष्काळ, तेथे जनावरांना वर्षभर पुरेल इतक्या चा-याचा प्रश्न, अपु-या व नापिक, जमिनी, जलसिंचनाचा अभाव, शेती उत्पादन वाढीसाठी आधुनिक उत्पादन तंत्रांचा अभाव व हीन सामाजिक दर्जा व आर्थिक मागासलेपणा इत्यादी कारणांमुळे ऊस तोड कामगारांचे स्थलांतर होत आहे. याच बरोबर कारखाना परिसरातील आर्थिक विषमतेमुळे स्थानिक कामगार ऊस तोडणीच्या कामाकडे ओढले गेले आहेत.

कामगारांचे स्थलांतर हे विशिष्ट अंतरावर आणि विशिष्ट दिशेने होत असते. म्हणून सर्वेक्षणामध्ये ऊस तोड कामगारांच्या स्थलांतराची रचना, दिशा व प्रमाण ही अभ्यासलेले आहे. ऊस तोड कामगारांच्या

स्थलांतराची रचना, तीन प्रकारची आहे. उदा. जिल्हांतर्गत स्थलांतर, आंतर जिल्हा स्थलांतर व आंतरराज्य स्थलांतर. आंतरराज्य स्थलांतरापेक्षा आंतर जिल्हा स्थलांतर अधिक प्रमाणात झालेले आहे. कारण आंतर राज्य स्थलांतरामध्ये सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक समस्या निर्माण होत असतात. तसेच वेगळया घटक राज्य सरकारचो कामगारांच्या स्थलांतरावर बंधने असण्याची शक्यता असते. ऊस तोड कामगारांच्या स्थलांतराचे प्रमाण हे त्यांचे मूळगाव ते सांगली साखर कारखाना यांच्यातील सरासरी अंतराच्या सहाय्याने दर्शविले आहे.

५.४ ऊस तोड कामगारांची कौटुंबिक वैशिष्टये :

ऊस तोड कामगारांच्या कौटुंबिक वैशिष्टयाबाबत प्रमुख अनुमाने खालील प्रमाणे आहेत :

५.४.१ ऊस तोड कामगारांच्यामध्ये दर हजार पुरूषांमागे ७१६.८२ इतके स्त्री कामगारांचे प्रमाण आढळून आले.

५.४.२ एकूण ऊस तोड कामगारांपैकी ८७.६२ टक्के कामगार हे १६ ते ४५ वर्षे या वयोगटातील आहेत. म्हणजे ऊस तोडणीच्या कामावर असणारे बहुसंख्य स्त्री-पुरूष कामगार हे तरूण प्रौढ वयोगटातील आहेत.

५.४.३ एकूण ऊस तोड कामगारांच्यामध्ये मराठी भाषिकांचे प्रमाण अधिक आहे. मराठी भाषा बोलणाऱ्यांचे प्रमाण ९१.१ टक्के इतके असून कन्नड बोलणाऱ्यांचे प्रमाण केवळ ८.९ टक्के इतके आहे.

५.४.४ ऊस तोड कामगारांच्यामध्ये विवाहितांचे प्रमाण ८४.४४ टक्के इतके असून राहिलेले कामगार अविवाहित, विधूर व विधवा या गटात मोडणारे आहेत.

५.४.५ ऊस तोडणी कामगारांच्यामध्ये मराठेत्तर जातीचे प्रमाण अधिक आहे. मराठ्यांचे प्रमाण ४३.३४ टक्के तर मराठेत्तरांचे प्रमाण ५६.६६ टक्के इतके असून मराठेत्तरांच्यामध्ये अनुक्रमे धनगर, हरिजन, बलुतेदार, कोळी व मुसलमान यांचे प्रमाण अधिक आहे. थोडक्यात हलक्या जातीतील कामगारांचे प्रमाण अधिक आहे.

५.४.६ उचलवाल्या ऊस तोड कामगारांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण ३३.३३ टक्के इतके असून निरक्षरांचे प्रमाण जास्त म्हणजे ६६.६६ टक्के इतके आहे. साक्षरांच्यामध्ये केवळ प्राथमिक शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण अधिक आढळते.

५.४.७ ऊस तोड कामगार कुटुंबामध्ये १ ते २ मुले असणाऱ्यांचे प्रमाण ३० टक्के, ३ ते ४ मुले असणाऱ्यांचे प्रमाण ३६.६७ टक्के व ५ पेक्षा अधिक मुले असणाऱ्यांचे प्रमाण केवळ ३.३३ टक्के इतके आहे.

५.४.८ बहुतेक ऊस तोड कामगार कुटुंबातील सभासद संख्या (६२.२२ टक्के) ३ ते ६ इतकी असून १ ते २ सदस्य संख्या असणाऱ्यांचे प्रमाण ३४.४५ टक्के इतके तर ७ पेक्षा अधिक सदस्य असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३.३३ टक्के इतके आहे. कुटुंबाचे सरासरी आकारमान ३.४७ इतके आहे.

५.४.९ ऊस तोड कामगार कुटुंबांच्यामध्ये दोन सदस्य मिळविते असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ६८.८९ टक्के इतके तर केवळ एकच मिळविता असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण १७.७८ टक्के व तीन किंवा तीनपेक्षा अधिक मिळविते सदस्य असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण १३.३३ टक्के इतके आहे.

५.४.१० ऊस तोड कामगार कुटुंबाच्यामध्ये अवलंबित सदस्य असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ५६.६७ टक्के इतके आहे. १ ते २ सदस्य अवलंबून असणाऱ्या कुटुंबांची संख्या अधिक आहे. तसेच सर्वेक्षणात असेही आढळून आले

की, ऊस तोड कामगार कुटुंबाच्या बरोबर असणाऱ्या अवलंबितांच्यापेक्षा मूळ गावी असणाऱ्या अवलंबित सदस्यांचे प्रमाण अधिक आहे.

५.५ रोजगार, वेतन व कामगार संघ स्थिती :

ऊस तोड कामगार सातत्याने ऊस तोडणीच्या कामावर येत असूनही ते कंत्राटी व हंगामी कामगारच राहिलेले आहेत. ते कायम स्वरूपी कामगार नाहीत. हंगामेत्तर काळातही त्याना पुरेसा रोजगार मिळत नाही. हंगामेत्तर काळात महिन्यात सरासरी १२ दिवसच काम मिळते व दैनंदिन मजुरी सरासरी १२ रुपये मिळत असल्याचे आढळते.

५.५.१ या कामगारांचे कामाचे तास, विश्रांतीच्यावेळा, आठवडयाचे कामाचे दिवस निश्चित नसून पगारी रजा व सार्वजनिक सुट्यांचा लाभ मिळत नाही.

५.५.२ या कामगारांना सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभ व नुकसान भरपाई मिळत नाही.

५.५.३ वेतन दर हा किमान वेतन कायदा व तत्सम एखाद्या शास्त्रीय पध्दतीनुसार ठरविला जात नसून करार पध्दतीने ठरविला जातो. वेतन दर ठरविताना कामगारांच्या कार्यक्षमतेचा विचार केला जात नाही. स्त्री-पुरूष वेतन भिन्नता आढळत नाही. वेतनाची रक्कम कंत्राटदार व मुकादम या मध्यस्थामार्फत मिळते त्यामुळे कामगारांचे आर्थिक शोषण होते. समाधानाची गोष्ट म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रभर ऊस तोडणीचा दर एकच आहे.

शेतमजुरांशी तुलना करता याना पैशातील वेतन जास्त मिळते. परंतु याना आपले गाव सोडावे लागते. त्यामुळे स्वत:चे घर व शेती यावर

लक्ष देता येत नाही. आहार व आरोग्य याबाबत आबाळ होते. यामुळे यांचे वास्तव वेतन अल्प आहे. औद्योगिक कामगारांशी तुलना करता यांचे पैशातील व वास्तव वेतन अत्यंच आहे.

५.५.४ ऊस तोडणी कामगार व गाडीवान कंत्राटाद्वारे कामावर घेतले जातात.परंतु हे कंत्राटदार कंत्राटी कामगार अधिनियमांतर्गत परवाना घेत नसावेत. मजूरखाते याकडे दुर्लक्ष करते. अशा परिस्थितीत कंत्राटदारांच्याकडून कामगारांच्या होणाऱ्या शोषणाला कायद्याने आळा घालता येत नाही. त्यामुळे हे भटक्या गुलामीचे व वेठबिगारीचे जीवन जगत आहेत.

५.५.५ या कामगारांना कारखान्याकडून बोनस, वैद्यकीय मदत, भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन यासारखे लाभ मिळत नाहीत. कारखान्याकडून फक्त कोयता व बैलगाडी भाड्याने व झोपडी बांधण्यासाठी बांबू, तट्या व चिवटया पुरविल्या जातात. हंगामेत्तर काळातील निम्मे वेतन व बोनस मिळावा अशी या कामगारांची अपेक्षित मागणी आहे.

५.५.६ या कारखान्यामधील ऊस तोड कामगारांच्यापेक्षा कामगार नेतृत्व अधिक जागृत आहे. ऊस तोड कामगार नियमित वर्गणी भरून संघटनेचे नोंदणीकृत सदस्य होत नाहीत. परंतु कामगार संघाची कृती यशस्वी करण्यास पूर्ण पाठिंबा देतात. भारतातील अन्य राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रात व या कारखान्यावर ऊसतोड कामगारांची संघटना अधिक चांगली आहे. इतर राज्यांत ऊस तोड कामगारांची स्थिती वाईट आहे. कारण ऊस उत्पादकानीच ऊस तोडून कारखान्यास पुरवावयाचा असतो. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्याकडून असंघटित ऊस तोड कामगारांना कमी व भिन्न वेतनदर देऊन त्यांचे आर्थिक शोषण केले जाते. ही स्थिती महाराष्ट्रात नाही. या कारखान्यातील ऊस तोड कामगार संघाने कारखान्याच्या आवारातील गाडी

ळावर पिण्याचे पाणी, प्रकाश व्यवस्था, कामगारांना झोपड्या बांधण्या-साठी बांबू, चिवटया व तट्या मिळवून देणे, साखर शाळा, बैल जखमी झाल्यास व झोपडी जळाल्यास आर्थिक मदत देण्याची तरतूद वेळोवेळी वेतन दरात वाढ यासारख्या मागण्या मान्य करून घेतल्या आहेत. या सर्व कामगार संघ कृतीचे श्रेय कामगार संघाच्या नेत्याकडेच जाते असे मत बहुतेक सभासदांनी व्यक्त केले आहे.

५.५.७ सर्वेक्षणात असे आढळून आले की, ५२.४३ टक्के इतकी कुटुंबे कर्जबाजारी असून ९७.८७ टक्के इतक्या कर्जाची परतफेड झालेली नाही.

हंगामाच्या सुरुवातीस कंत्राटदारांच्याकडून घेतलेली उचल व मूळगावी घेतलेली कर्जे असे त्यांच्या कर्जाचे दोन प्रकार असून ही कर्जे प्रामुख्याने कंत्राटदार, सावकार, बँका व सहकारी सोसायटया यांच्याकडून व्यक्तिगत पत, शेतजमीन व पीक तारणावर घेतलेली आहेत. उचल कर्ज त्याच हंगामाच्या काळात परत केल्यास त्यावर व्याज आकारले जात नाही. एकूण कर्जापैकी २७.९० कर्जे कर्जे ही उत्पादक हेतूने (शेती सुधारणा व घरबांधणी) व ७२.१० टक्के कर्जे ही अनुत्पादक हेतूने घेतलेली आढळली. हंगामाच्या काळात त्यांचे उत्पन्न शिल्लक रहात असले तरी हंगामेत्तर काळात रोजगाराचा अभाव, शेतीतून कमी उत्पन्न यामुळे शिल्लक रकमेचा वापर हंगामेत्तर काळात उदरनिर्वाहासाठी करावा लागतो. परिणामी कर्जाची परतफेड होत नाही. यामुळे मूळ गांवी सावकारांच्या कर्जफासात व हंगामाच्या काळात कंत्राटदारांच्या कर्जात सापडलेले असतात.

५.६ <u>उत्पन्न व खर्चविषयक माहिती</u> :

५.६.१ २००० रूपयांच्या पर्यन्त मासिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ९२.२३ टक्के इतके असून केवळ ७.७७ टक्के उत्तरदात्यांचे मासिक उत्पन्न २००० रूपयेपेक्षा अधिक आहे.

५.६.२ १५०० रुपयांपर्यन्त मासिक खर्च असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ९१.११ टक्के इतके असून ८.८९ टक्के उत्तरदात्यांचा मासिक खर्च १५०० रुपयांपेक्षा अधिक आहे व यामध्ये मुख्यत: बैलगाडीवानांचा समावेश होतो. कारण बैलांना पेंड व गाडी दुरूस्तीचा खर्च असतो.

ऊस तोड कामगार कुटुंबांचे मासिक सरासरी उत्पन्न १३२२.२२ रुपये असून मासिक सरासरी खर्च रुपये ९५२.७७ इतका आहे. कुटुंबाचा सरासरी आकार ३.४७ इतका आहे. त्यामुळे ऊस तोड कामगारांचे मासिक दरडोई उत्पन्न ३८१.०४ रुपये व दरडोई खर्च रुपये २७४.५७ इतका येतो व प्रति महिन्यास दरडोई १०६.४७ रुपये शिल्लक ठेवू शकतात. म्हणजे एक ऊस तोड कामगार कुटुंब प्रति महिन्यास (१०६.४७ x ३.४७) ३६९.४५ रुपये शिल्लक ठेवू शकते व कारखान्याचा गळीत हंगाम सर्वसाधारणपणे ६ महिन्यांचा गृहित धरल्यास (३६९.४५ x ६) प्रत्येक गळीत हंगामात २२१६.७० रुपये म्हणजे थोडक्यात असे म्हणता येईल की २००० ते २५०० रुपये पर्यन्त शिल्लक ठेवू शकतात.

५.६.३ या कामगारांच्या एकूण उपभोग खर्चापैकी अन्नधान्ये व किराणा माल यावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण ५६.९९ टक्के इतके आहे. रेशन कार्डधारक केवळ ११.१२ टक्के इतके असून ८८.८८ टक्के कामगार रेशन कार्ड धारक नाहीत. त्यामुळे बाजारभाव वाढीबरोबर त्यांच्या राहणीमानाची पातळी घटत जाते. तेव्हा जीवनावश्यक वस्तू वाजवी भावाने मिळत नाहीत, ही एक त्यांची महत्वाची समस्या आहे.

५.६.४ यांचेकडे रेडिओ, फर्निचर यासारखी व इतर मौलिक मालमत्ता नसून त्यांची बरोबर असणारी एकमेव मौलिक मालमत्ता म्हणजे गाय, म्हैस, बैल, शेळ्या ही जनावरे होत. जवळजवळ ७० टक्के कुटुंबाकडे वरील प्रकारची जनावरे आहेत.

## ५.७ राहण्याची व्यवस्था शिक्षण व आरोग्यविषयक माहिती :

### ५.७.१ राहण्याची व्यवस्था -

ऊस तोड कामगार बांबू, चिवटया, तट्टया व ऊसाच्या पाल्याच्या झोपडया बांधून राहतात. झोपडीसाठी जागेची समस्या नसते. स्वयंपाकासाठी स्वतंत्र खोली नसते. झोपडीबाहेर तीन दगडाच्या चुलीवर स्वयंपाक करतात. तेथे संडास, मुतारी व स्वतंत्र स्नानगृहाची सोय नसते. स्त्रियाही उघडयावरच स्नान करीत असतात. तसेच पिण्याच्या पाण्याची सोय नसते. स्वयंपाकासाठी स्टोव्ह व गॅस वापरला जात नसून वाळलेल्या काटक्यावरती स्वयंपाक केला जातो. झोपडीमध्ये विजेचे दिवे नसतातच परंतु रेशन कार्ड नसल्यामुळे चिमण्यासाठी रॉकेलही उपलब्ध होत नाही.

त्यांच्या मूळगांवी ही राहत्या घराची अशीच दुरावस्था आहे. कारण मूळगावी ही ५८.८९ टक्के कुटुंबे पाल्याचे छप्पर असणाऱ्या घरात, ४१.११ टक्के कुटुंबे धाब्याच्या, पत्र्याच्या व कौलारू छप्पर असणाऱ्या घरात राहतात. स्थलांतराच्या काळात त्यांच्या मूळगावच्या घराची व्यवस्था त्यांचे पाठीमागे राहिलेले म्हातारे आई-वडील, शाळेला जाणारी मुले, इतर कुटुंबीय पहात असतात.

### ५.७.२ शिक्षणाची व्यवस्था -

एकूण उत्तरदात्यांपैकी ५६.६७ टक्के उत्तरदाते त्यांच्या मुलांना शाळेस पाठवित असून, ४३.३३ टक्के उत्तरदाते मुले शाळेस पाठवित नाहीत. मूळच्या गावच्या शाळेत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण १०० टक्के इतके असून शाळेस न जाणाऱ्या मुलांपैकी ९६.४१ टक्के मुलेही कामास मदत व लहान भावंडांना सांभाळणे या दोन कारणामुळे जात नाहीत. मुलांच्या शिक्षणासाठी

कारखान्याकडून अर्थसहाय्य मिळत नसून कारखान्याने सुरू केलेल्या साखर शाळा यशस्वी ठरलेल्या नाहीत.

५.७.३ सामाजिक जीवन व सवयी -

ऊस तोड कामगारांना रेडिओ ऐकणे, पेपर वाचणे, प्रौढशिक्षण वर्गात जाणे, खेळ खेळणे यासारख्या सवयी नाहीत. लग्न, सण, उत्सव यासारख्या सामाजिक कार्यक्रमात भाग घेणाऱ्यांचे प्रमाण १०० टक्के इतके आहे. तसेच पान खाणाऱ्यांचे प्रमाण ४४.४४ टक्के, तंबाखु खाणाऱ्यांचे प्रमाण ९१.११ टक्के, चहा पिणाऱ्यांचे प्रमाण ६१.११ टक्के दारू पिणाऱ्यांचे प्रमाण १७.७७ टक्के व बिडी ओढणाऱ्यांचे प्रमाण ८.८९ टक्के इतके असून हे कामगार एकाचवेळी एकापेक्षा अनेक व्यसनांच्या आहारी गेलेले दिसून येतात.

५.७.४ आरोग्य व कुटुंब नियोजन -

गरजेनुसार दवाखान्यात जाऊन औषधे घेणाऱ्यांचे प्रमाण १०० टक्के इतके आहे. यापैकी ११.११ टक्के प्राथमिक आरोग्य केंद्रात व ८८.८९ टक्के उचरदाते खाजगी दवाखान्यात औषधोपचार घेत असल्याचे आढळून आले.

गरोदरपणात सकस आहार व औषधोपचार घेतले जात नसून घरगुती उपचारावर अवलंबून राहणाऱ्यांचे प्रमाण ९४.४५ टक्के इतके असून बाळंतपण घरच्या घरी सुईणीच्या मदतीने पार पाडणाऱ्यांचे प्रमाण ८८.८९ टक्के इतके आहे.

ऊस तोड कामगारांच्या लहान मुलांचे आरोग्य मध्यम प्रकारचे असून त्यांना गोवर व त्रिगुणी लस टोचण्याचे प्रमाण जवळ जवळ १०० टक्के इतके आहे.

कुटुंब नियोजनविषयक माहिती व कुटुंब नियोजन आवश्यक आहे म्हणणाऱ्यांचे प्रमाण १०० टक्के इतके आहे. परंतु गर्भपातास पूर्णपणे विरोध दर्शविला आहे. तांबी या कुटुंब नियोजन साधनाचा वापर सर्वाधिक होत असून कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारच्या कुटुंब नियोजन साधनांचा वापर करणाऱ्यांचे प्रमाण ५५.५५ टक्के इतके आहे. व कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतलेल्यांचे प्रमाण ४५.५५ टक्के इतके आहे.

## ५.८ ऊस तोड कामगारांच्या महत्वाच्या समस्या व काही सूचना :

ऊस तोड कामगारांच्या कामाचे स्वरूप, त्यांच्या स्थलांतराचे स्वरूप व प्रमाण, त्यांची कौटुंबिक वैशिष्टये व सामाजिक आर्थिक स्थिती अभ्यासल्यानंतर या कामगारांच्या अनेक समस्या आहेत असे दिसून येते. स्थानिक कामगारांच्या पेक्षा स्थलांतरीत ऊस तोड कामगारांच्या समस्या अधिक गंभीर आहेत. कारण स्थलांतरामुळेच त्यांना त्यांचे घर व शेतीकडे लक्ष देता येत नाही, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होतो. तसेच त्याची कामाची स्थिती व सेवा शर्ती याबाबतीत अनेक समस्या निर्माण झाल्यामुळे तो अनेक कामगार कल्याण कायद्यांच्या लाभापासून वंचित राहिलेला आहे. कारखान्यातील कामगारांच्यापेक्षा ऊस तोड कामगारांच्या समस्या अधिक आहेत. ऊस तोडणी व वाहतूक करणारे कामगार उत्पादनाशी संबंधित कारखान्याचेच कामगार आहेत व त्यांना कारखान्यातील कामगारांप्रमाणे वेतन मिळेल या रीतीने दर ठरविले जावेत हे तत्व उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निवाडयातून प्रस्थापित झाले असताना त्यांची अद्यापही अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे कामगारांचे आर्थिक शोषण होत आहे. अशारितीने या कामगारांच्या खालील प्रमाणे काही प्रमुख समस्या आहेत व त्या समस्यांचे निवारण करण्याबाबत काही सूचना करण्याचा प्रयत्न केला आहे.

५.८.१ ऊस तोड कामगार हे कंत्राटी कामगार असून ते कारखान्याचे कामगार समजले जात नाहीत. त्यामुळे ते कायम स्वरूपी कामगार नसल्याने त्यांना पगारी रजा, सार्वजनिक सुट्टयांचा लाभ मिळत नाही. कामाचे तास निश्चित नाहीत. बोनस, भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन, नुकसान भरपाई, औषधोपचारासाठी अर्थसहाय्य इत्यादी लाभांपासून ते वंचित राहिलेले आहेत. या कामगारांना कायम करून घेतले व त्यांच्या कामाचे तास निश्चित केले तर ऊस तोडणीच्या कामात दिरंगाई, काम चुकवेपणा वाढेल, कारखान्यास ताज्या ऊसाचा पुरवठा पुरेसा होणार नाही, साखरेच्या उता-यावर व उत्पादन खर्चावर अनिष्ट परिणाम होईल, असा साखर उद्योजकांच्याकडून युक्तीवाद केला जातो. बांधकाम, ऊस तोडणी यासारखी मनुष्य बळावर अवलंबून असणारी कामे करार पध्दतीनेच वेळेवर होऊ शकतात. म्हणून त्यांना कायम स्वरूपी कामगार करता येणार नाही.

यावर उपाय म्हणजे ज्याप्रमाणे कारखान्यामध्ये हंगामी असणा-या कामगारांना हंगामेत्तर काळात निम्मा पगार दिला जातो, त्याप्रमाणे सतत ऊस तोडणीच्या कामावर येणा-या कामगारांना हंगामेत्तर काळात निम्मे वेतन द्यावे. त्यांच्या मूळ गांवी रोजगाराचा अभाव असल्याने हंगामेत्तर काळात त्यांची जी आर्थिक समस्या असते, ती काही प्रमाणात या उपायामुळे सुटण्यास मदत होईल.

५.८.२ सर्वसाधारण विचार करता व्यवहारिक दृष्टया या कामगारांना कायम करणे शक्य दिसत नाही. त्याचप्रमाणे कल्याणकारी राज्यव्यवस्थेमध्ये या कामगारांना कामगार कल्याण व कामगार कायदे यांच्या लाभापासून त्यांना वंचित ठेवणे, हा त्यांच्यावर अन्याय ठरणार आहे. म्हणून या कामगारांना कोणत्या ना कोणत्या तरी मार्गाने आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी साखर कारखान्याने ` ऊसतोड कामगार समस्या निवारण

निधी ` स्थापन करावा. या निधीची भांडवल उभारणी साखर कारखाना, ऊसतोड कामगार व राज्य सरकार यांनी मिळून करावी. कारखान्याने ऊसाच्या प्रत्येक टनामागे सर्वसाधारणपणे एक रूपया या निधीसाठी कापून घ्यावा. तसेच ऊसतोड कामगारांच्या मासिक वेतन रकमेच्या १ टक्का इतकी रक्कम पगारातून कापून घ्यावी व तितकाच हिस्सा राज्य सरकारने या निधीस अर्थसहाय्य या स्वरूपात द्यावा. असा सर्वसाधारण विचार सुचवावा वाटतो. या निधीचा आकार व वर्गणीचा दर हा त्या कारखान्यातील कामगार संख्या व त्यांची आर्थिक गरज यानुसार बदलता येईल. या निधिचा वापर खालील गोष्टींसाठी करावा.

५.८.३ यांचे कामाचे तास व विश्रांतीच्या वेळा निश्चित करणे शक्य नसले तरी त्यांना आठवडयातून एक दिवस पगारी सुट्टी द्यावी. सुट्टीच्या दिवसाचे वेतन त्यांच्या आठवडयाच्या कामाच्या सरासरी वेतनाइतके मानावे. हे वेतन ` ऊसतोड कामगार समस्या निवारण निधी ` मधून द्यावे.

५.८.४ ऊस तोड कामगारांना कामावर असताना अपघात झाल्यास आवश्यक नुकसान भरपाई ऊसतोड कामगार समस्या निवारण निधीमधून द्यावी. नुकसान भरपाईची रक्कम ही येणारा खर्च व तो कामगार सतत किती वर्षे ऊस तोडणीच्या कामावर येत आहे यावरून ठरवावी.

५.८.५ वेतन व फरकाची रक्कम कंत्राटदारांच्याकडून न देता कारखान्याने नेमलेल्या पगारी अधिका-यामार्फत ऊसाच्या फडावर जाऊन कामगारांच्या हातात प्रत्यक्ष द्यावी. म्हणजे कंत्राटदारांच्याकडून होणा-या आर्थिक शोषणास पायबंद बसेल.

५.८.६ कारखान्यातील हंगामी कामगाराप्रमाणे ऊसतोड कामगारांना ही बोनस द्यावा. हा बोनस ` ऊसतोड कामगार समस्या निवारण निधीमधून,

देण्यात यावा. म्हणजे कारखान्यावर खर्चाचा भार अधिक पडणार नाही.

५.८.७ ऊस तोड कामगारांचे वेतन ठरविताना किमान वेतन कायदा कामगारांची कार्यक्षमता, एकूण साखर उत्पादन खर्चातील ऊसतोडणी खर्चाचा हिस्सा, जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती या गोष्टी विचारात घेऊन वाजवी जीवनमानाच्या स्तरावर त्यांना जगता येईल, इतपत वेतन मिळू शकेल याची दक्षता घ्यावी.

५.८.८ स्थलांतराच्या काळात स्वत:ची शेती व घर यावर लक्ष देता यावे म्हणून महिन्यातून एकवेळ मूळ गांवी जाऊन येण्याचा जो प्रवास खर्च आहे, तो ऊसतोड कामगार समस्या निवारण निधीमधून देण्यात यावा. स्थलांतरीत ऊसतोड कामगार कुटुंबातील एक व्यक्तीसच (कुटुंब प्रमुख) हा खर्च देण्यात यावा.

५.८.९ ऊस तोडणी कामगार व गाडीवान याना कामावर घेताना कंत्राटदारांनी कंत्राटी कामगार अधिनियमांतर्गत परवाना घ्यावा. असे परवाने घेतले जातात की नाही यावर मजूर खात्याने लक्ष ठेवावे. या अधिनियमाचे पालन न करणाऱ्या कंत्राटदारांना शिक्षेची व दंडाची तरतुद करावी म्हणजे कंत्राटदारांच्याकडून ऊस तोड कामगारांच्या होणाऱ्या आर्थिक शोषणास पायबंद बसेल.

५.८.१० ऊसतोड कामगारांची कर्जविषयक समस्याही महत्वाची आहे. सातत्याने त्याच कारखान्यामध्ये ऊस तोडणीच्या कामास येणाऱ्या ऊस तोड कामगारांना अल्प व मध्यम मुदतीची कर्जे ऊसतोड कामगार समस्या निधीमधून द्यावीत. परंतु मंजूर केलेली कर्ज रक्कम सिवसम्म एकाच हप्त्यात देऊ नये. वेतनाच्या रकमेतून प्रतिवर्षी कर्जफेडीची क्षमता किती है विचारात घेऊन त्या प्रमाणात हप्त्याहप्त्याने कर्ज रक्कम द्यावी म्हणजे कर्जाची परतफेडही होईल व

ऊस तोड कामगारांची सावकारांच्या व कंत्राटदारांच्या कर्जपाशातून व गुलामगिरीतून मुक्तता होईल.

५.८.११ या कामगारांची गळीत हंगामाच्या काळात घरविषयक समस्या सोडविण्यासाठी या कारखान्याने कामगार संघटनेच्या मागणीनुसार मंजूर केलेली खोलता येणाऱ्या घरांची योजना अधिक व्यापक व ताबडतोब कार्यान्वित करावी. गळीत हंगामाच्या काळात या कामगारांची एका विभागातून दुसऱ्या विभागात बदली होत असते. म्हणून घरे ताबडतोब खोलता येतील व पुन्हा ताबडतोब जोडता येतील, हंगाम संपल्यानंतर ती खोलून कारखान्याकडे जमा करता येतील अशी योजना आहे. या घरांची उभारणी करीत असताना एका टोळीमध्ये एक किंवा दोन सार्वजनिक स्नानगृहांची व्यवस्था करावी. म्हणजे कामगार स्त्रियांना उघड्यावर स्नान करावे लागणार नाही. तेथे पिण्याचे पाणी व दिवाबत्तीची सोय करावी.

५.८.१२ ऊस तोड कामगारांच्याकडे स्वस्त धान्याचे कार्ड नसल्यामुळे त्यांचे वाढत्या किंमतीमुळे आर्थिक शोषण होते. तेव्हा हंगामाच्या काळामध्ये अन्नधान्ये, साखर, खाद्यतेल, रॉकेल यासारख्या जीवनावश्यक वस्तू कामाच्या ठिकाणच्या गावातील स्वस्त धान्य दुकानातून खरेदी करता येतील अशा परवान्याचे, गळीत हंगामाच्या मुदतीत वापरता येईल असे पत्रक कारखान्याने राज्य सरकारकडून मिळवून द्यावे. सभासद शेतकऱ्यांच्या प्रमाणे ऊस तोड कामगारांनाही कारखान्याकडून सवलतीच्या दराने साखर मिळावी.

५.८.१३ सर्व ऊस तोड कामगारांना नोंदणीकृत सदस्य करून घ्यावे व कामगार संघटना अधिक प्रबळ करून सौदाशक्ती वाढवावी. संघाने केवळ लढाऊ कार्येच न करता कामगार कल्याण कार्यावर भर द्यावा.

५.८.१४ प्रत्येक टोळीतील कामगारांच्या लहान मुलांची संख्या विचारात घेऊन त्या मुलांना सांभाळण्यासाठी एक किंवा दोन पगारी स्त्रियांची नेमणूक करावी. त्यांचा पगार ऊस तोड कामगार समस्या निवारण निधीमधून द्यावा, म्हणजे लहान भावंडांचा सांभाळ करण्याच्या कारणामुळे जी मुले शाळेस जाऊ शकत नाहीत ती जाऊ शकतील.

५.८.१५ ऊस तोड कामगार हा हंगामा पुरताच स्थलांतरीत होत असतो. हंगामाच्या काळातही तो एकाच ठिकाणी स्थायिक नसतो. त्यामुळे कामाच्या ठिकाणी मुलांना शाळेत घालणे शक्य होत नाही. त्यामुळे साखर शाळा योजना फलदायी ठरली नाही. तेव्हा ७ ते १४ वर्षांची मुले त्यांच्या मूळगावच्या प्राथमिक शाळेमध्येच घालावी. परंतु त्यांना पाटी, पुस्तके व वह्या इत्यादींच्या खर्चासाठी अर्थसहाय्य ऊस तोड कामगार समस्या निवारण निधीमधून द्यावे. बहुतेक कारखान्यांची महाविद्यालये व माध्यमिक शाळा आहेत. अशा शाळांमध्ये ऊस तोड कामगारांच्या गुणी व हुषार विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन तेथे त्यांची वसतिगृहात राहण्याची व जेवणाची मोफत सोय करावी.

५.८.१६ लहान मुलांना ऊस तोडणीच्या कामावर घेऊ नये.

५.८.१७ कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या ऊस तोडणी कामगारांच्या राहत्या तळावर आठवड्यातून एक किंवा दोन वेळा भेटी देऊन त्यांना प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याची तरतूद करावी.

५.८.१८ दीर्घकालीन आजारपण व अपघाताच्यावेळी औषधोपचाराची सोय कारखान्याच्या दवाखान्यात करावी. ऊस तोड कामगार दीर्घकाळ आजारी व ऊस तोडणीचे काम करण्यास असमर्थ आहे. तोपर्यंतच्या काळात त्याच्या कुटुंबियांना ऊस तोड कामगार समस्या निवारण निधी मधून अर्थसहाय्य मिळवून देण्याची तरतूद करावी.

तसेच प्राथमिक आरोग्य सेवांची पूर्तता करण्यासाठी कारखान्याने फिरत्या दवाखान्याची सोय करावी. स्त्री कामगारांच्या बाळंतपणाची सोय कारखाना परिसरात असणाऱ्या दवाखान्यात करावी.

५.८.१९ ऊस तोड कामगारांच्यामधील तंबाखु, विडी व दारूचे व्यसन कमी व्हावे, कुटुंब नियोजनाचा अधिक प्रसार व्हावा, कुटुंब नियोजन साधनांच्या वापरासंबंधी माहिती व्हावी, यासाठी ऊसतोड कामगारांच्या राहत्या ठिकाणी संबंधित खात्यामार्फत प्रचार कार्याची व्यवस्था करावी.

५.८.२० ऊस तोड कामगारांच्या राहत्या ठिकाणी जाऊन गरोदर स्त्रियांची तपासणी व लहान मुलांना गोवर व त्रिगुणी लस टोचण्याची तरतूद करावी.

५.८.२१ ऊस तोड कामगारांची सहकारी पतसंस्था स्थापन करावी.